# पाचोरा नगरपरिषद कार्यालय पाचोरा

## स्टेशन रोड, पाचोरा जि. जळगांव

☎ (०२५९६) २४०१०१, २४०१६६ फॅक्स नं. २४३१५५

Website: www.pachoranp.gov.in, Email: copachora@gmail.com

पा.क्र./बांध/३८७५/सन २०१८ दि. १०/१२/२०१८

वाचावे :-

१) नगरपरीषद कार्यालयीन बांधकाम परवानगी जा.क्रं./बांध/९८२/सन २०१५ दि. २३/०७/२०१५

२) मे.स्पिंग शेल्टर्स, पाचोरा यांचा दि. ३०/०५/२०१८ रोजीचा विनंती अर्ज व त्यासोबत आर्किटेक्ट श्री.संजय जी.म्हाळस, दि.डिझाईनर्स कलेक्टिव्ह, नाशिक यांचे कंम्पलिशन सर्टिफिकेट.

३) नगरपरीषद अभियंता यांचा दिनांक १५ /११/२०१८ रोजीचा प्रत्यक्ष पाहणीनुसार तपासणी अहवाल.

-------------------------

## -: भोगवटा प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की,

श्री.सदाशिवराव रावसाहेब देशमुख रा. पाचोरा यांना पाचोरा नगरपरीषद क्षेत्रातील सिटी सर्व्हे नंबर १८०७ (एकुण क्षेत्र ११७४.१० चौ.मी ) जागेवर अस्तीत्वातील (Type A) वाणिज्य + रहिवास वापर ईमारत व्यतीरीक्त प्रस्तावित (Type B) ईमारत ग्राऊंड फ्लोअर १७.५८ चौ.मी., स्टिल्ट फ्लोअर २८७.६३ चौ.मी., फर्स्ट फ्लोअर २८७.६३ चौ.मी., सेकंड फ्लोअर २८७.६३ चौ.मी., थर्ड फ्लोअर २८७.६३ चौ.मी. (एकुण क्षेत्र ११६८.१० चौ.मी.) बांधकामासाठी नगरपरीषदेने उक्त संदर्भीय क्रं.१ अन्वये बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

नगरपरीषदेने दिलेल्या (Type B) ईमारत बांधकाम परवानगी व मंजुर नकाशाप्रमाणे संपुर्ण ईमारतीचे बांधकाम पुर्ण केलेले असल्याचे उक्त संदर्भीय क्रं. २ च्या अर्जासोबत आर्किटेक्ट श्री.संजय जी.म्हाळस, दि.डिझाईनर्स कलेक्टिव्ह, नाशिक यांचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्याअनुषंगाने अभियंता पाचोरा नगरपरीषद यांनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणी अहवालानुसार सदर इमारत वापराकरीता भागश: भोगवटा प्रमाणपत्र खालील अटी व शर्तीस अधिन राहुन देण्यात येत आहे.

नगरपरीषदेच्या मंजुर प्लॅन व्यतीरीक्त ईमारतीचे कोणतेही वाढीव / अतिरीक्त बांधकाम वा फेरबदल करु नये. मंजुर बांधकाम नकाशा व्यतीरीक्त बांधकाम आढळल्यास ते मालक / भोगवटादार यांनी स्वत:हुन हटविणे बंधनकारक राहील. आणि सदर अनाधिकृत विनापरवानगी बांधकाम महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम तरतुदीच्या अधिन कारवाईस पात्र राहील.

ईमारत मालक / भोगवटादार यांनी ईमारत आवारातील रेन वॉटर हार्वेस्टींग, सांडपाणी नियोजन, कचरा संकलन आणि वृक्ष संवर्धन इ.कामे कायमस्वरुपी सुस्थितीत राखणे बंधनकारक आहे.

ईमारती सभोवताल वृक्ष लागवड व ईमारती लगत वाहन पार्किंग मुळे वाहतुक व्हिजीबीलीटी ॲबस्ट्रक्ट होणार नाही. यासाठी दक्षता घेण्यात यावी. पार्किंग नियमांचे पालन करावे. ईमारत आवार व लगतचा परिसर पार्किंग क्षेत्र कायम मोकळे ठेवावे. पार्किंग्च्या जागेवर कुठल्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये.

प्रत्येक फ्लोअरवर सार्वजनिक जिना, वहिवाट वापर आणि आग प्रतिबंध यंत्रणा कायमस्वरुपी सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी. अग्निसुरक्षा प्राधिकरणाकडून ईमारत वापर प्रमाणीत करुन घ्यावे. सदर रहिवास ईमारतीमधील कच-यासाठी पर्यावरण अधिनियम १९८६ आणि घनकचरा व्यवस्थापन नियम १९८८ च्या तरतुदीनुसार आणि नगरपरीषद प्रचलीत उपविधीनुसार स्वतंत्रपणे विल्हेवाट / अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. मुख्यत्वे खाद्य पदार्थ, टाकाऊ कचरा सुरक्षितपणे विल्हेवाट करावी. त्यामुळे लगतच्या वहिवाट धारकांना अडचण ठरणार नाही. याची दक्षता घ्यावी.

ईमारत परिसर आणि ईमारत विल्हेवाट वापर ईको फ्रेंडली तत्वाच्या अधिन / शासन नियमांच्या अधिन ठेवणे आपणावर बंधनकारक राहील.

पाचोरा नगरपरिषद पाचोरा जि जळगांव

**मुख्याधिकारी,**
**पाचोरा नगरपरीषद, पाचोरा.**
**जि.जळगांव.**

**प्रत :-**

कर अधिक्षक, वसुली विभाग, पाचोरा नगरपरीषद यांचेकडेस व्यापारी संकुल ईमारतीची तपासणी करुन सत्वर कर आकारणी लागु करणेसाठी रवाना.

Spring Shelter,
Rukhmini Neigbr